शिवाजी विद्यापीठ
तक्रार निवारण समिती
कोल्हापूर.

# तक्रार निवारण समिती, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**तक्रार अर्ज क्रं.२६/२०२२**

श्री.सुहास व्यंकटेश कुलकर्णी
१९१, शाहूनगर, नेहरू उद्यानाजवळ,
जयसिंगपूर, ता.शिरोळ, कोल्हापूर } तक्रार अर्जदार

विरूध्द्

१. खेडूत शिक्षण मंडळ कालकुंद्री, चंदगड
जि.कोल्हापूर.

२. र.भा.माडखोलकर महाविद्यालय, चंदगड,
जि.कोल्हापूर. } वि.प.

खेडूत शिक्षण मंडळ, कालकुंद्री, चंदगड, जि.कोल्हापूर यांचे र.भा.माडखोलकर महाविद्यालय, चंदगड, जि.कोल्हापूर येथील शिक्षक श्री.सुहास व्यंकटेश कुलकर्णी यांनी तक्रार निवारण समितीकडे दि.१३/११/२०२२ रोजी तक्रार अर्ज दाखल केला आहे. अर्जामध्ये नमूद तक्रार पुढीलप्रमाणे,

**तक्रारीचे स्वरूप :**

मी जून १९९८ पासून सदर महाविद्यालयात पूर्ण वेळ अधिव्याख्याता/ सहाय्यक प्राध्यापक म्हणून सेवेत कायम आहे. दि ०३/०८/२०१५ रोजी मला सेवेतून बडतर्फ करण्यात आले. त्याविरूध्द् मी मे.विद्यापीठ न्यायाधिकरण, पुणे यांचेकडे अपिल दाखल केले होते. अपिल क्र.१४/२०१५(एस) च्या निकालासानुसार माझ्या बडतर्फीचा आदेश रद्दबातल झाला. दि.२१/०७/२०१७ पासून मी सेवेत पूर्ववत रूजू झालो. तथापि दि.२१/०४/२०१७ च्या निकालानुसार मला दि.०३/०८/२०१५ पासून देय असणारे थकीत व नियमित वेतन नियमानुसार अदा करणेत आले नाही. मे.विद्यापीठ न्यायाधीकरणाच्या आदेशानुसार मला शासन नियमानुसार देय असणारे वेतन फरकासहीत अदा करणेबाबत संबधितांना आदेश व्हावेत.

**संस्थेचा अभिप्राय :**

अपिल नं.१४/२०१५(एस) च्या दाव्यामध्ये दि.२१/०४/२०१७ रोजी झालेल्या ऑर्डरनुसार श्री.एस.व्ही.कुलकर्णी हे महाविद्यालयाच्या सेवेत दि.२१/०७/२०१७ रोजी हजर झाले. हजर तारखेपासूनचे सर्व वेतन अदा करण्यात आलेले आहे.

शिवाजी विद्यापीठ तक्रार निवारण समिती कोल्हापूर.

वरील दि.२१/०४/२०१७ च्या ऑर्डर विरूध्द् श्री.कुलकर्णी यांनी मुंबई उच्च न्यायालयात याचिका क्रमांक ९१११/२०१७ नुसार याचिका दाखल केली आहे. त्यावरील निकाल प्रलंबित आहे.

**महाविद्यालयाचा अभिप्राय :**

मुंबई उच्च न्यायालयातील याचिका क्रमांक ९१११/२०१७ च्या निर्णयाचे पालन केले जाईल.

**समितीची निरिक्षणे :**

सदर प्रकरणाचा पूर्व इतिहास मे. पीठासीन अधिकारी, विद्यापीठ व महाविद्यालय न्यायाधिकरण, पुणे तसेच मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचे आत्तापर्यंत पारित झालेले आदेश या सर्वाचे अवलोकन केले असता या समितीचे मत असे आहे की, प्रस्तुतची तक्रार ही मुदतपूर्व आहे. बडतर्फ काळातील वेतन व भत्त्यांस तक्रारदार पात्र आहे किंवा नाही हा प्रश्न अद्यापही मा. उच्च न्यायलयासमोर प्रलंबित आहे. प्रस्तूतची तक्रार ही महाविद्यालयात गैरहजर राहिल्यामुळे त्यास निलंबीत करुन खातेनिहाय चौकशी करुन त्यास दि. २३.०४.१२ रोजी सेवेतून बडतर्फ करण्यात आले. याविरुध्द् त्यांनी मे. पीठासीन अधिकारी विद्यापीठ व महाविद्यालय न्यायाधिकरण, पुणे यांचेसमोर अपील दाखल केले असून त्याचा अपील क्रमांक १४/२०१५ (S) असा होता. त्याचा निकाल दि.२१.०४.२०१७ रोजी लागला. त्या निकालाची प्रती या प्रकरणी दाखल करण्यात आली आहे. सदरचे अपील अशंतः मंजूर करण्यात आले होते आणि दि.०३.०८.२०१५ रोजीचा सेवामुक्ती आदेश खारिज करण्यात आला व तक्रारदारास दि.०३.०८.२०१५ पासून त्याची सेवा मूळ पदावर म्हणजे अधिव्याख्याता या पदावर आदेशाच्या तारखेपासून तीन महिन्यात आत पुर्नस्थापित करण्याचा आदेश पारित करण्यात आला. तसेच व्यवस्थापनेस तक्रारदारास जारी करण्यात आलेल्या दोषारोप पत्रातील आरोप क्र.२ वगळता इतर आरोपाची नव्याने चौकशी करण्याची मुभा देण्यात आली आणि दरम्यानच्या काळातील थकीत वेतन व इतर लाभ जर नव्याने खातेनिहाय चौकशी करण्याचे व्यवस्थापनाने ठरविले तर खातेनिहाय चौकशीच्या निकालावर अवलंबून राहिल असे मे. पीठासीन अधिकारी, विद्यापीठ व महाविद्यालय न्यायाधिकरण, पुणे यांनी आदेश पारित केले आहेत. या आदेशाविरुध्द् प्रस्तुत तक्रारदारांनी मा.उच्च न्यायालय, मुंबई याचिका क्रमांक ९१११/२०१७ दाखल केलेली असून ती याचिका अद्यापही प्रलंबित असल्याचे दिसून येते. दि.१५.०१.२०१८ रोजी मा. उच्च न्यायालयाने सदर प्रकरणामध्ये पुढील आदेशापर्यत मे. पीठासीन अधिकारी विद्यापीठ व महाविद्यालय न्यायाधिकरण, पुणे यांचे दिनांक २१.०४.२०१७ चा आदेश अमंलात आणला जाणार नाही अशा स्वरुपाचा अंतरिम आदेश पारित केलेला आहे. त्यात असे नमूद केले आहे की, सदर संस्थेचे चेअरमन हे मरण पावलेले असून विश्वस्त मंडळ विसर्जित झालेले

शिवाजी विद्यापीठ, तक्रार निवारण समिती, कोल्हापूर.

असल्याने आणि नव्याने निवडणुका घेण्याचे आदेश पारित झाल्यामुळे तक्रारदाराविरुध्द् नव्याने खातेनिहाय चौकशी सुरु केली जाईल किंवा नाही याबद्दलचे ठोस निवेदन मा.उच्च न्यायालयासमोर करता येऊ शकत नाही असे निवेदन संस्थेमार्फत मा.उच्च न्यायालयासमोर केल्याचे आदेशात नमूद केलेले आहे. या समितीसमोर झालेल्या युक्तिवादा दरम्यान तीच परिस्थिती आजही अस्तित्वात असल्याचे निदर्शनास आलेले आहे. त्यामुळे अद्यापही तक्रारदारा विरुध्द् नव्याने खातेनिहाय चौकशी सुरु झाली नसल्याचे दिसून येते. त्यामुळे मे. पीठासीन अधिकारी, विद्यापीठ व महाविद्यालय न्यायाधिकरण, पुणे यांच्या आदेशानुसार तक्रारदाराच्या थकीत वेतनाच्या पात्रतेसंबंधी अद्यापी कोणतेही निर्णय झालेला नाही. त्यामुळे या समितीने वर असे नमूद केले आहे की, तक्रारदाराच्या तक्रारीतून मागणी ही मुदतपूर्व आहे आणि ती आज या घटकेला मान्य करता येत नाही. सबब, प्रस्तुतची तक्रार आज घटकेला अमान्य करावी लागेल या निष्कर्षाला ही समिती आलेली आहे.करीता ही समिती खालील आदेश पारित करीत आहे.

## आदेश

प्रस्तुतची तक्रार नामंजूर करण्यात येत आहे.

झालेल्या निर्णयाच्या प्रती संबधिताना देऊन तसे कळविणेत यावे.

**दिनांक :** 2 6 MAR 2024

**सदस्य सचिव**
**(श्रीमती ए.ए.कदम)**

**सदस्य**
**(श्रीमती ए.एच.कोलेकर)**

**सदस्य**
**(प्रा.डॉ.एस.पी.हंगिरगेकर)**

**सदस्य**
**(डॉ.व्ही.एन.शिंदे)**

**सदस्य**
**(प्रा.डॉ.एस.एस.महाजन)**

**सदस्य**
**(श्री.एस.यु.शिंदे)**

**अध्यक्ष**
**(श्री.ए.व्ही.देशपांडे)**